देशोन्नती

# सायबर शिक्षा, सायबर सुरक्षा समुपदेशन वर्गाचे आयोजन

**अड्याळ :** सुजाता कन्या विद्यालय अड्याळ येथे दि. १८ ऑगस्ट २०२५ ला जे.एम. पटेल महाविद्यालयातील संगणक श्रेणीमध्ये शिक्षण घेत असलेल्या दोन विद्यार्थीनींनी वर्ग ५ ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थीनींना सायबर गुन्हे ह्या विषयाअंतर्गत अत्यंत महत्वाचे समुपदेशन केले. खुशबू मरघडे व युक्ती बिसने या दोन समुपदेशकांनी शालेय विद्यार्थीनींना सायबर शिक्षण महत्वाचे असून चुकीच्या मार्गाने वापर केल्यास त्याचा जास्त प्रमाणात धोका निर्माण होऊ शकतो. सायबर गुन्हे अंतर्गत फेसबुक व्हॉटसअॅप, इंस्ट्राग्राम ट्विटर अशा चॅटींग अॅपद्वारे आपली सर्व माहिती हॅक करून त्याचा गैरवापर करणे, आपल्या मोबाईलवर वाईट संदेश पाठवणे अशाप्रकारचे गुन्हे घडतात. त्यामुळे समाजाचे नुकसान होते.

प्रामुख्याने तरूणपीढी यामध्ये जास्त बळी पडते आणि आपल्या भविष्याचे नुकसान करते, असे व्हायला नको म्हणून सायबर पोलिसांना फोन करून आपण आपली सुरक्षा कशी करावी, याबाबत समुपदेशन करण्यात आले.

आपली समस्या सांगून तात्काळ मदत घेऊ शकतो किंवा दुसऱ्यांची मदत करू शकातो आणि कोणतीही वाईट घटना होण्यापासून थांबवू शकतो. अश्याप्रकारच्या समुपदेशनाद्वारे सायबर गुन्हे मोठ्या संख्येने आटोक्यात येऊ शकतात. उपरोक्त समुपदेशनप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षा मुख्या. भारती गिरडकर यांनी आपले मत व्यक्त केले. तसेच शिक्षक गायधने, देशमुख, शेंडे, पोटवार, धुरंधर, विद्यार्थी प्रतिनिधी सायली चंदनबावणे या सर्वांनी आपले मत मांडले. कार्यक्रमाचे अयोजन उज्वला धुरंधर यांनी केले.

Bhandara Edition
Aug 22, 2025 Page No. 6
Powered by: erelego.com